# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र./मनपा/उदयान/मिरारोड/६८३ /२०२५-२६** **दिनांक: २५/०८/२०२५**

**प्रति,**
**सिस्टम मॅनेजर,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

**विषय — संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत. (विकास कामात बाधित झाडे मुळासहित काढणे व पुर्न: रोपण करणेकामी)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामात बाधित झाडे मुळासहित काढणेकामी व पुर्न:रोपण करणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

**(नागेश विरकर)**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

**जा.क्र./मनपा/उद्यान/मिरारोड/ ६९३ /२०२५-२६** **दिनांक: २५ /०९/२०२५**

## // जाहीर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम ८(३) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहीर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | झाडाचे नाव | अंदाजे उंची | नग | ट्री सेंन्सेस नुसार झाडांचे वय | मुळासहित काढणे / पूर्नरोपण करणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उंबर | २५ ते ३० फुट | ०१ नग | ४६ वर्ष | मुळासहित काढणे | भाईंदर (प.)., डोंगरी गाव, उत्तन रोड, येथिल श्री. मोहम्मद दाऊद शेख यांच्या घराच्या आवारात झाड उंच वाढलेले असून बाजुच्या असलेल्या निक्सन मोराईस यांच्या घरावर धोकादायकरित्या झुकलेले आहे. सदरचे झाड जोराच्या वा-या पावसाने पडून जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरच्या झाडाची उंची पाहता सदरचे झाड काढून पुर्नरोपन करणे शक्य नाही. या कारणास्तव धोकादायक झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. **(श्री. मोहम्मद दाऊद शेख यांचे दि.१८/०९/२०२५ रोजीचे पत्र)** |
| २ | रेन्ट्री | १५ ते २० फुट | ०१ नग | ३६ वर्ष | | भाईंदर (प.), राई गाव, येथिल मनपा रोडवरिल झाड उंच वाढलेले असून धोकादायकरित्या मुख्य रस्त्यावर पुर्णपणे झुकलेले आहे. सदर झाडाखाली राई गावात जाणारा मुख्य रस्त्या असुन शाळकरी मुले व नागरिकांना धोका असल्याने सदरचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. **श्री. हितेश राठोड, ठेका उद्यान अधिक्षक दि.२२/०९/२०२५ रोजीचा पाहणी अहवाल.** |
| ३ | सोनमोहर | २० ते २५ फुट | ०१ नग | २१ वर्ष | | भाईंदर (प.), स्टेशन रोड, येथिल संतोष ज्वेलर्सच्या समोरिल मनपा रोडवरिल झाड उंच वाढलेले असून धोकादायकरित्या मुख्य रस्त्यावर झुकलेले आहे. जो-याच्या वा-या पावसाने झाड पडून जिवित हानी व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. **श्रीम. योजना जाधव, ठेका उद्यान अधिक्षक दि.०९/०९/२०२५ रोजीचा पाहणी अहवाल.** |

| अ.क्र. | झाडाचे नाव | अंदाजे उंची | नग | ट्री सेंन्सेस नुसार झाडांचे वय | मुळासहित काढणे / पूर्नरोपण करणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | पुंत्रजिवा | ३० ते ३५फुट | ०१ | २० वर्ष | मुळासहित काढणे | भाईंदर (पू.), आर.एन.पी. पार्क राजपुत पॅलेस इमारती समोर येथिल मनपा मुख्य रस्त्यावरिल झाड उंच वाढलेले असून सदर झाडाच्या बुंध्याच्या आतील बाजुस किड / वाळवी लागलेली आहे. सदर मनपा रोडवर नेहमीच मोठ्या प्रमाणात नागरिकांची व वाहनांची वर्दळ असते. जो-याच्या वा-या पावसाने झाड पडून जिवित हानी व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. **माजी नगरसेवक श्री मदन उदितनारायण सिंह यांचे दि.११/०७/२०२५ रोजीचे पत्र प्राप्त दि.१७/०७/२०२५** |
| ५ | सप्तपर्णी | ३० ते ३२ फुट | ०१ | २१ वर्ष | | भाईंदर (पू.),राजेश हॉटेल गल्ली येथील महावीर नगर परीसरात रस्त्याचे कॉक्रीटीकरणाचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. सदर कामाच्या आखणी मध्ये ०२ नग सप्तपर्णीची झाडे बाधित होत आहे. तसेच ०१ झाडांच्या मुळ्या जमिनीवरती आल्या असुन बाजुला असलेल्या घराच्या भिंतीमध्ये जात आहेत. या कारणास्तव सदरची झाडे मुळासकट काढणे आवश्यक आहे. **मा.उप अभियंता (सा.बां.) यांचे दि.२३/०९/२०२५ रोजीचे पत्र.** |
| | सप्तपर्णी | ३० ते ३२ फुट | ०१ | ३१ वर्ष | | |
| ६ | बदाम | २० ते २५ फुट | ०३ | १० वर्ष | मुळासहित काढणे | मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भाईंदर (पूर्व) खाडी किनारा विकसीत करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. सदर ठिकाणी १९ नग झाडे गटार लाईन टाकण्यात अडथळा निर्माण करीत असुन विकास कामात बाधित होत आहे. या कारणास्तव सदरचे १२ नग झाडे मुळासहित काढणे व ०७ नग झाडे पुर्न:रोपण करणे आवश्यक आहे. **मा.कार्यकारी अभियंता (सा.बां.) यांचे दि.१७/०९/२०२५ रोजीचे पत्र.** |
| | सप्तपर्णी | २५ ते ३० फुट | ०१ | १२ वर्ष | | |
| | शेवगा | २० ते २५ फुट | ०४ | १० वर्ष | | |
| | नारळ | २५ ते २० फुट | ०४ | १२ वर्ष | | |
| | आंबा | ८ ते १० फुट | ०१ | ०७ वर्ष | पुर्न:रोपण करणे | |
| | नारळ | ०५ ते ०६ फुट | ०६ | ०५ वर्ष | | |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उद्यान विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**(नागेश विरकर)**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**